# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : ६४८/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.अशोक बापू पाटील,
ए ४०४, मारुती पॅराडाईज,
सेक्टर १५, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, अधिन सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांचे कार्यालय, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, अधिन सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांचे कार्यालय, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १३/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १/१०/२०२१ | ---- | १२/११/२०२१ | १३/१/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२०/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई यांनी मारुती पॅराडाईस सहकारी गृह निर्माण संस्था, बेलापूर यांचे कामकाजाबाबत व तक्रारीबाबत पारित केलेले आदेश अन्वये माहिती मिळणेबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१३/१/२०२२ रोजी, *“ जाब देणार जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती सदरचा आदेश प्राप्त झालेपासून १५ दिवसांचे आत या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेस देण्यात यावी. जी माहिती उपलब्ध नाही त्या बाबतीत तसे अर्जदार यांना स्पष्टपणे कळविण्यात यावे. मुद्दा क्र.१, ३ व ५ ची माहिती संस्था स्तरावरील असल्याने संस्थेने उपलब्ध असलेली कागदपत्रे व माहिती लेखी स्वरूपात अर्जदारस द्यावी आणि जी कागदपत्रे व माहिती उपलब्ध नाही त्याबाबत देखील लेखी कळविणेची दक्षता घ्यावी.”* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. सुनावणीची सूचना त्यांना प्राप्त झालेबाबत पोस्ट ट्रॅकिंग रिपोर्ट प्राप्त झालेला नसल्याने त्यांना सूचना प्राप्त झाली किंवा कसे हे स्पष्ट होत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी, अधिन सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांचे कार्यालय यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी **- यांना प्रत** --
-- सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ८,
५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. **यांचेमार्फत रवाना.** (सहनिबंधक यांनी सदरची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)